नियमित दिवाणी दावा क्र. ०५ / २०१२

**<u>निशाणी क. ३८ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे :—

वादीने प्रतिवादींविरूध्द मा. तहसिलदार, अक्कलकोट यांनी दिलेला हुकूम बेकायदेशीर असल्याने जाहीर ठरावाचा व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केला आहे. वादी हा अर्जातील परिच्छेद क्र २ मध्ये नमुद मजकूर हा दाव्यात परिच्छेद क्र ३ अ म्हणून समाविष्ट करून दुरूस्ती मागत आहे. ही दुरूस्ती तांत्रिक स्वरूपाची असून दावा दाखल झाल्यानंतरच्या घटनेमुळे वादीला करणे जरूरीचे आहे. त्यामुळे वस्तुस्थिती अभिलेखावर येणार आहे व दावा विषयात बदल होत नाही शेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादींनी दाव्याचे स्परूपात बदल आहे त्यामुळे अर्ज नांमंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिले.

४. वादीतर्फे अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र नि क ३९ सादर करण्यात आले. वादीतर्फे नि क्र ४० समवेत मा अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाची प्रत सादर करण्यात आली. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबतचा आहे. प्रस्तूत दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीचा आहे. अर्जातील नमूद कारण पाहता वादीने केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. जरी दावा दुरुस्त केला तरी दाव्याचे स्वरुप बदलत नाही. वादीची जी मागणी आहे तिच मागणी कायम राहते. तसेच प्रतिवादींच्या बचावातही फरक पडत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण दिसते. करीता आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.क्र. ३८ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने नि.क्र. ३८ मध्ये विनंती केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती आजपासून चौदा दिवसांच्या आत करावी.

३. वादीने या अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ५००/— प्रतिवादींना पुढील तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी दयावेत.

दि. ०८.०२.२०१७

(सु.श.देशमुख )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
अक्कलकोट

<u>दाखला</u>

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, मूळ हुकूम / निकालपत्राच्या पीडीएफ फाईलमधील सर्व मजकूर हा मूळ हुकूम / निकालपत्राप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव : आर.एम.शिर्के

न्यायालय : सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अक्कलकोट

दिनांक : ०८.०२.२०१७

हूकूम / निकालपत्रावर न्यायिक अधिकारी यांची सही दिनांक : ०८.०२.२०१७

हूकुम / निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक : ०९.०२.२०१७